ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग
अर्थशास्त्र, व्यापार,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
एकमेव मराठी
साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं
प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २६ पुणें, बुधवार तारीख २७ जानेवारी, १९६० अंक ४




## दशमान पद्धतीचीं वजनें व मापें

माणूस प्रथम आपल्या बोटांचा उपयोग करून आंकडे मोजावयास शिकतो म्हणून दहापर्यन्तच्या आंकड्यांची पद्धति सुरू झाली असण्याचा संभव आहे. वजनें व मापें यांची मेट्रिक पद्धति ही दशमान पद्धति आहे म्हणजे त्यांतील प्रत्येक वरचें प्रमाण लहानाच्या दहा पटीने राहील. ही पद्धति जगांत सर्वत्र अंमलांत आणण्यांत आली असून त्यामुळें रुपांतर व हिशेब करणें सुलभ जातें. दशमान नाण्यांची पद्धति सुरू केल्यानंतर वजनें व मापें यांबाबतची दशमान पद्धति अंमलांत आणणें हे तर्कदृष्ट्या सुसंगत ठरेल.

| | |
|---|---|
| वजनें | १ किलोग्रॅम = २ पौंड ३ औंस |
| | १ किलोग्रॅम = १ शेर ६ तोळे |
| मापें | १ मीटर = ३९.३७ इंच |
| | १ हेक्टर = २.५ अेकर |
| | १ लिटर = १$\frac{3}{4}$ पिंट |
| | १ क्युबिक मीटर = ३५ क्युबिक फूट |



FAIRDEAL
DIRECPUB

**काँग्रेसच्या अधिवेशनाचा खर्च**—काँग्रेस पक्षाचें ६५ वें वार्षिक अधिवेशन बंगलोर येथें भरविण्यांत आलें होतें. ह्या अधिवेशनासाठीं सुमारें २० लाख रु. खर्च आला. काँग्रेसच्या अधिवेशनाला खर्च फार होतो अशी तक्रार कांहीं प्रतिनिधींनीं केली. त्यावर पुढील वर्षी खर्च कमी करण्याच्या दृष्टीनें पावलें टाकण्यांत येतील अशी आशा काँग्रेसचे अध्यक्ष श्री. संजीव रेड्डी ह्यांनीं व्यक्त केली.

**एअर इंडिया वैमानिकांचा संप**—एअर इंडिया इंटर नॅशनलच्या वैमानिकांनीं केलेला संप तडजोड झाल्यामुळें आतां मागें घेण्यांत आला आहे. वैमानिकांच्या संपामुळें एअर इंडियाचें रोज ३॥ लाख रुपयांचें नुकसान होत होतें. कंपनीचें वार्षिक उत्पन्न १२ कोटी रुपयांचें आहे. संपामुळें परदेशीय चलनाच्या प्राप्तींत बरीच खोट आली आहे.

**शहरांची नियोजित वाढ**—भारतामधील शहरांत राहणाऱ्या लोकसंख्येची झपाट्यानें वाढ होत असतां नव्या गलिच्छ वस्त्या निर्माण होत आहेत. हें टाळण्यासाठीं येत्या पंधरा वर्षांच्या काळांत शहरांची वाढ नियोजित रीतीनें झाली पाहिजे, अशा आशयाचें पत्र पंतप्रधान नेहरू ह्यांनीं राज्यांच्या मुख्य मंत्र्यांना धाडलें आहे.

**पतंग उडविण्याची चढाओढ**—अहमदाबाद कॉर्पोरेशननें जानेवारीच्या २५ तारखेस पतंग उडविण्याची चढाओढ लावली होती. अशा प्रकारची चढाओढ लावणारें अहमदाबादचें एकमेव कॉर्पोरेशन आहे. गेल्या वर्षी ह्या चढाओढींत ४०० स्पर्धकांनीं भाग घेतला होता. चढाओढीसाठीं मोठा पोलिसबंदोबस्त ठेवावा लागतो.

**उत्तर भारतांतील हिंदू देवालयें**—उत्तर प्रदेशामधील देवालयांची व्यवस्था आपल्या ताब्यांत घेण्याचें राज्य सरकारनें ठरविलें आहे. देवालयांना मिळणाऱ्या देणग्या व भक्तांनीं दिलेलें आर्थिक साह्य ह्यांचा योग्य उपयोग करतां यावा म्हणून हा निर्णय घेण्यांत आला आहे. ह्याबाबत लवकरच एक कायदा करण्यांत येणार असून त्याचा अंमल सुरू झाल्यावर देवळांच्या मालमत्तेची वासलात लावणें शक्य होणार नाहीं.

**वाया जाणारें कमी प्रतीचें मँगेनीझ**—कमी प्रतीच्या मँगेनीझचा उपयोग करण्याची एक नवीन पद्धत जमशेटपूर येथील राष्ट्रीय खनिज संशोधन संघटनेनें शोधून काढली आहे. ह्या पद्धतीमुळें कमी प्रतीच्या मँगेनीझचा उपयोग करतां येईल. भारतामधील मँगेनीझच्या खाणींतून दरसाल १० लाख टन कमी प्रतीचें मँगेनीझ निघतें.

**अफूच्या उत्पादनांत दुप्पट वाढ**—१९४८ मधील उत्पादनाशीं तुलना करतां भारतामधील अफूचें उत्पादन १९५८ सालीं जवळ जवळ दुप्पट झालें आहे. १९५९ सालीं भारतानें अफूच्या जागतिक उत्पादनापैकीं दोनतृतियांश म्हणजे, ६५७ टन अफू पुरविली. बाकीचें उत्पादन तुर्कस्थान, रशिआ, पाकिस्तान, जपान, इत्यादि देशांनीं केलें.

**कॅनडामधील भारतीयांना मतदानाचा हक्क**—कॅनडाचें पार्लमेंट आपल्या पुढील अधिवेशनांत कायदा करून कॅनडाच्या निवडणुकींत मतें देण्याचा हक्क तेथें स्थायिक झालेल्या भारतीयांना देणार आहे. कॅनडांत स्थायिक झालेल्या १,७५,००० भारतीयांनीं ह्या हक्कासाठीं कॅनडाच्या मुख्य प्रधानांना व प्रे. आयसेनहोअर ह्यांना विनंती केली होती. आतां ८०,००० हिंदी नागरिकांना मतदानाचा हक्क मिळेल.


# बँक ऑफ पूना, लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. १२,५०,००० |

—: संचालक मंडळ :—

१. श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, चेअरमन
२. डॉ. ना. भि. परुळेकर, व्हाईस चेअरमन ( संचालक, सकाळ )
३. श्री. फ्रामजी पी. पोचा
४. श्री. गणपतराव काळुराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

अल्प मुदत ठेवींवर आकर्षक व्याज.

...शाखा...

पुणें (१) सदाशिव पेठ, (२) डेक्कन जिमखाना (३) सांगली.

हेड ऑफिस व सांगली शाखेंत अल्प भाड्यांत लॉकरची सोय.

मुख्य ऑफिस : ४५५ रविवार पेठ, पुणें

गो. गं. साठे, मॅनेजर



स्थापना १९३६

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस :

पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा शहर.

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई, गिरगांव, ३ मुंबई, दादर, ४. नासिक, ५. पुणें, ६. बार्शी, ७. लोणंद, ८. कोल्हापूर, ९. हलकर्णी, १०. इचलकरंजी, ११. फलटण.

३० जून, १९५९ अखेर

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ४,७५,००० |
| ठेवी | रु. | १,६८,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,९५,००,००० |

मुदत ठेवींवरील व्याज :

| १ वर्ष ते २ वर्षे | तीन वर्षे | ५ वर्षे | दहा वर्षे |
|---|---|---|---|
| रु. ३·०० | रु. ३·२५ | रु. ३·५० | रु. ४·०० |

रु. एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

दराबाबत चौकशी करावी.

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १·०० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | १·५० |
| चालू डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | ०·५० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जन. मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

# अर्थ

बुधवार, ता. २७ जानेवारी, १९६०





संस्थापक : प्रा. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## भांडवली मालाच्या उत्पादनांत स्वयंपूर्णता हवी

माइनिंग, मेटॅलर्जिकल अँड जिऑलॉजिकल इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया ह्या संस्थेच्या वार्षिक खान्याच्या प्रसंगीं बोलतांना टाटा आयर्न अँड स्टील कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर सर जहांगीर गांधी ह्यांनीं भांडवली मालाच्या उत्पादनाबाबत आपले विचार प्रगट केले. ते म्हणाले कीं भांडवली मालाच्या उत्पादनाच्या बाबतींत स्वतःच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवून भारतानें शक्य तितक्या लवकर स्वयंपूर्ण बनणें अतिशय जरूरीचें आहे. जगांत व्यापाराचे जे प्रवाह सध्यां वाहत आहेत त्यांच्याकडे लक्ष दिल्यास ही गोष्ट स्पष्ट होईल. भारतामधून जो कांहीं माल आजपर्यंत परंपरागत पद्धतीनें निर्यात होत आहे, त्यांत अधिक वाढ होण्याची शक्यता फारशी दिसत नाहीं. ह्याचा परिणाम म्हणून भांडवली मालाच्या आयातीसाठी लागणाऱ्या परदेशीय चलनांत दिवसेंदिवस घटच होत जाईल. झपाट्यानें होणाऱ्या औद्योगिक प्रगतीसाठी भांडवली मालाची गरज तर अधिकाधिक तीव्र होत जाणार आहे; म्हणून तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील प्रमुख कार्य म्हणजे भांडवली मालाच्या उत्पादनांत मोठी वाढ करणें, हें आहे. ह्या बाबतींत स्वयंपूर्ण होणें म्हणजे औद्योगीकरणाची निश्चिति करण्यासारखें आहे. भांडवली मालाच्या बाबतींत स्वयंपूर्ण होण्यासाठी पहिली गरज म्हणजे पोलाद. राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या नियोजनांत म्हणूनच पोलादाला प्राधान्य देण्यांत आलें आहे. पोलादाच्या धंद्याला लागणारा कच्चा माल हा भारतांत भरपूर प्रमाणांत आहे. हें खरें. ह्या मालाच्या साह्यानें भरभराटलेला पोलादाचा धंदा चालू शकेल. पण, ह्याचा अर्थ भारताच्या खनिज संपत्तींत समतोलपणा आहे असा मात्र नाहीं.

---

## भारतामधील क्षयरोग्यांची मोठी संख्या

भारतामधील क्षयरोगाच्या प्रसाराची पहाणी करण्याचें काम नॅशनल ट्युबरक्युलॉसिस सर्व्हे ह्या संघटनेनें पुरें केलें आहे. १९५५ च्या अखेरीस पहाणीच्या कामाला प्रारंभ करण्यांत आला व १९५८ च्या प्रारंभीं तें पूर्ण करण्यांत आलें. तपासणी व पहाणीसाठी देशांतील निरनिराळया मोठ्या शहरांतील, मध्यम शहरांतील व खेड्यांतील लोकविभाग निवडण्यांत आले होते. सहा मोठीं शहरें, ३० गांवें आणि १५१ खेडीं ह्यांमधील सुमारें ३,००,००० लोकांची पहाणी करण्यांत आली. पहाणीवरून असें दिसून आलें कीं, भारतामध्यें ५० लाख लोकांना क्षयरोगाची बाधा झालेली आहे. पहाणी फुप्फुसाच्या क्षयाबाबत असल्यानें इतर प्रकारच्या क्षयरोग्यांचा समावेश तींत करण्यांत आलेला नाहीं. इतर प्रकारच्या क्षयरोग्यांचा समावेश केला, तर क्षयरोग्यांची संख्या ५० लाखांपेक्षाहि अधिक होईल ह्यांत शंका नाहीं. क्षयरोगाबाबत एक अशी समजूत आहे कीं मोठ्या शहरांतील गर्दीच्या भागांत राहणाऱ्या लोकांनाच तो अधिक प्रमाणांत होतो. पण ह्याचा अर्थ ग्रामीण भागांत क्षयरोगाचा प्रसार कमी असतो असें नाहीं. ग्रामीण भागांतहि क्षयरोगाचा प्रसार बराच झालेला आहे, असें पहाणींत आढळून आलें आहे. अर्थात् शहरांतील क्षयरोग आणि ग्रामीण भागांतील क्षयरोग ह्यांच्या क्षेत्रांच्या बाबतींत फरक आहे. शहरांतील क्षयरोग हा दाटीवाटीची वस्ती असलेल्या गरिबांच्या विभागांत प्रामुख्यानें दिसून येतो. ह्या केंद्रित झालेल्या रोगक्षेत्रावर उपाय करणें तुलनात्मकदृष्ट्या सोपें जातें. ग्रामीण भागांतील क्षयरोगाला आळा घालण्यासाठी अधिक योजनापूर्वक परिश्रम होणें जरूरीचें आहे, असें आढळून आलें.

---

## शेतीच्या उत्पादनांत वाढ होण्याची आवश्यकता

अमेरिकन शेतकऱ्यांचें दहा जणांचें एक प्रतिनिधिमंडळ सध्यां भारताचा दौरा करीत आहे. प्रतिनिधिमंडळानें आतांपर्यंत पंजाब, राजस्थान, आंध्रप्रदेश, मुंबई व म्हैसूर राज्यांचा दौरा पुरा केला आहे. ओरिसा, मद्रास, उत्तरप्रदेश आणि पश्चिम बंगाल ह्या राज्यांतील शेतीचें अवलोकनहि मंडळ करणार आहे. मंडळाचे पुढारी मि. गारलंड हेन्ड्रिक्स म्हणाले कीं भारतामधील शेतीपुढें आज एकच प्रमुख प्रश्न उभा आहे; आणि तो म्हणजे उत्पादन-वाढीचा. भारतामधील सध्यांच्या परिस्थितींत दोन गोष्टींत एकसारखी स्पर्धा चाललेली दिसून येते. देशांतील लोकसंख्या वेगानें वाढत आहे. पण त्याच वेगानें शेतींतील उत्पादनांत मात्र वाढ होत नाहीं. उलट लोकसंख्या व शेतीचें उत्पादन ह्यांच्यांतील तफावत वाढतच चालली आहे. सध्यां ज्या जमिनी लागवडीखाली आणण्यासारख्या असून पेरल्या जात नाहींत त्या लागवडीखाली आणाव्या लागतील. त्याशिवाय शेतीची व्यवस्था चांगली ठेवण्यास शिकलें पाहिजे. जनावरांपासून मिळणारें खत व रासायनिक खत ह्यांचाहि उपयोग वाढविण्यांत आला पाहिजे. कठोर परिश्रमाची आवश्यकता तर उघडच आहे. हें सर्व करतां येणें शक्य आहे. मुंबई राज्यांतील एक शेतीवसाहत ह्या दृष्टीनें नमुनेदार आहे. आज ज्या ठिकाणीं ही शेती आहे त्या ठिकाणीं १९४७ सालीं जंगल होतें. पण शेती करण्याच्या आधुनिक पद्धतींचा अवलंब करण्यामुळें आज ह्याच शेतींत दरएकरीं पिकाचें प्रमाण उंचावलें आहे. भारतीय शेतकऱ्यानें भरपूर कष्ट केले, शेतीवर सुव्यवस्था राखली, आणि अद्यावत् ज्ञानाचा उपयोग केला तर देशाच्या गरजा भागविण्याइतकें धनधान्य तो निर्माण करूं शकेल ह्यांत शंका नाहीं.

---

**तेलवहातुकीचे नळ**—रशिआच्या व्होल्गा नदीच्या खोऱ्यांत तेलाच्या खाणी आहेत. ह्या खाणींतील तेल पूर्व युरोपांतील देशांना पोंचविण्यासाठी सध्यां रेल्वेचा उपयोग करण्यांत येतो. पण, आतां तेलाच्या वहातुकीसाठी नळ घालण्याचें काम चालूं झालें आहे; काम पूर्ण झाल्यावर पोलंड, पूर्व जर्मनी, झेकोस्लोव्हाकिआ, हंगेरी इत्यादि देशांना तेलाचा पुरवठा करणें सुलभ होईल.

## पुणें सें. को. बँकेच्या बोर्डावरील सरकारचे प्रतिनिधी

**श्री. भोंडे, श्री. काकडे व असि. रजिस्ट्रार**

मुंबई राज्य सरकारनें सन १९६० सालाकरितां पुणें सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँकेच्या डायरेक्टर बोर्डावर बँकेच्या पोटनियम नं. ३३ अन्वयें श्री. रणछोड पांडुरंग भोंडे वकील, श्री. बा. सा. काकडे व असि. रजिस्ट्रार, ह्यांना आपले प्रतिनिधी म्हणून नेमलें आहे. बँकेच्या बोर्ड ऑफ डायरेक्टरांचें संचालक मंडळाची दुरुस्ती होऊन हल्लींचें बोर्ड २७ डायरेक्टरांचे आहे. त्यांपैकी तीन प्रतिनिधी सरकारनें नेमावयाचे आहेत. त्यास अनुसरून वरील नेमणुका झाल्या आहेत. श्री. भोंडे हे दि कॉसमॉस को. बँक, दि पूना अर्बन को. बँक, पुणें जिल्हा खरेदीविक्री संघ, ह्यांचे डायरेक्टर असून गतवर्षी सेंट्रल को. बँकेवर सोसायट्यांतर्फे डायरेक्टर म्हणून निवडून आले होते.

---

**श्री. जोग ह्यांच्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ**

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., पुणें २ चे व्यवस्थापक श्री. चिं. वि. जोग यांनीं लिहिलेल्या व व्हीनस बुकस्टॉलनें प्रकाशित केलेल्या 'बँका व त्यांचे कारभार' या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ रविवार २४ जानेवारी, १९६० रोजीं सायंकाळीं ५॥ वाजतां मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, टिळक रोड, पुणें २ येथें झाला.

समारंभाचें अध्यक्षस्थान रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे निवृत्त एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर श्री. जे. व्ही. जोशी ह्यांनीं स्वीकारलें होतें. या समारंभाच्या निमित्तानें त्यांचें "इंटरनॅशनल मॉनिटरी फंड: पहिलीं दहा वर्षे" या विषयावर भाषण झालें.

---

**हिंदी डॉक्टरचें सुयश**—कातड्याच्या रोगासंबंधीं कांहीं महत्त्वाचें संशोधन डॉ. यावलकर ह्यांनीं केलें आहे. त्वचा रोगासंबंधीं त्यांनीं रोगविषयक एका प्रसिद्ध जर्मन पुस्तकांत लेख लिहिला आहे. डॉ. यावलकर नागपूर मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी आहेत. त्यांनीं म्युनिच विद्यापीठांत शिष्यवृत्ति मिळवून दोन वर्षे त्वचारोगाच्या इस्पितळांत अभ्यास केला. ते नुकतेच परतले आहेत.

**वर्गीकृत जातींचें शिक्षण**—भारत सरकारनें काढलेल्या एका माहितीपत्रकांत अशी माहिती देण्यांत आली आहे कीं, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या तीन वर्षांत वर्गीकृत जातींच्या शिक्षणावर १०·६ कोटी रुपये खर्च करण्यांत आले आहेत. ह्याशिवाय इतर कांहीं तत्सम बाबींवर करण्यांत आलेला खर्चहि वरील आंकड्यांत धरलेला आहे.

**निंबोणीच्या बियांबाबत संशोधन**—कानपूर टेक्नॉलॉजिकल इन्स्टिट्यूटमधील एक संशोधक श्री. चॅटर्जी लंडन येथील एका संशोधन-संस्थेंत निंबोण्यांच्या बियांच्या तेलाचा व्यापारी दृष्ट्या उपयोग होऊं शकेल काय, ह्याविषयीं संशोधन करीत आहेत. तेलाचा वास कमी कसा करावा व त्याचें उत्पादन अल्पावकाशांत कसें करावें, हे दोन प्रमुख प्रश्न त्यांच्यापुढें आहेत.

**आस्वान धरणावरील वीज**—नाईल नदीच्या प्रवाहाचा उपयोग करून वीज निर्माण करणारें पहिलें केंद्र प्रे. नासर ह्यांच्या हस्तें चालू करण्यांत आलें. हें वीजकेंद्र ब्रिटनच्या सहकार्यानें बांधण्यांत आलें आहे. केंद्र बांधण्याच्या कामीं ज्या ब्रिटिश एंजिनिअरांनीं साह्य केलें त्यांचे खास आभार मानण्यांत आले.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २.

★ २६ जानेवारी १९६० ★

**प्रजासत्ताक दिनाच्या मंगल प्रसंगीं**

**आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना अभिवादन व शुभेच्छा.**

आपल्या साखर कारखान्याचें भाग्यशाली रौप्यमहोत्सवी वर्ष चालू असून या मंगल प्रसंगीं जाहीर करण्यास आनंद होतो कीं, कंपनीचें साखर व स्पिरीटचें उत्पादन उत्तम तऱ्हेनें चाललें असून कंपनीची दिवसेंदिवस प्रगतिपथावर वाटचाल चालू आहे.

**आतांपर्यंत साखरेचें उत्पादन नव्वद हजार पोतीं झालें आहे.**

के. त्र्यं. चाफेकर,
B. E., A. M. I. E.
मॅनेजर.

शं. ल. लिमये,
B. Sc., LL. B., वकील
अध्यक्ष.

## महाराष्ट्र रीजनल को-ऑपरेटिव्ह स्कूल, पुणें

**१०, बी. जे. रोड, टाटा लॉज, पुणें–१**

विद्यालयाचा पुढील शिक्षणवर्ग दि. १ एप्रिल, १९६० रोजीं सुरू होईल. विद्यालयांत सुपरवाझर, बँक इन्स्पेक्टर, असिस्टंट डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर, सब्-ऑडिटर, खरेदी-विक्री संघ, विविधकार्यकारी सहकारी सोसायटी व इतर मोठ्या सहकारी संस्थांचे सेक्रेटरी या दर्जाच्या नोकरवर्गांना शिक्षण दिलें जातें. विद्यालयाचा शिक्षणक्रम सहा महिने मुदतीचा आहे.

२. सहकारी सोसायटींत काम करणारे उमेदवार एस्. एस्. सी. उत्तीर्ण नसल्यास त्यांनीं सहकारी संस्थेंत कमींत कमी तीन वर्षें पगारी नोकरी केलेली असली पाहिजे आणि तें इंग्रजी १० वी, व्हर्नाक्युलर फायनल किंवा सेक्रेटरी शिक्षणवर्ग परीक्षा पास असले पाहिजेत. जागा शिल्लक असल्यास एस्. एस्. सी. पास असलेल्या विद्यार्थ्यांना खाजगी उमेदवार म्हणून प्रवेश मिळूं शकेल. तसेंच वरीलप्रमाणें शैक्षणिक पात्रता असल्यास स्त्रियांनाहि प्रवेश मिळूं शकेल.

३. प्रवेश दिलेल्या सोसायट्यांचे उमेदवारांना दरमहा रु. ४० प्रमाणें विद्यावेतन (स्टायपेंड) मिळेल व प्रात्यक्षिक शिक्षणाचे मुदतींत रु. ६० प्रवास-भत्ता मिळेल. खाजगी उमेदवारांना विद्यावेतन अगर प्रवास-भत्ता कांहींहि मिळणार नाहीं. या उमेदवारांना सुमारें ७५ रु. प्रवास खर्चासाठी खर्च करावे लागतात.

(अ) सहकारी संस्थांत नोकरी करणाऱ्या उमेदवारांनीं आपल्या संस्थेच्या ठरावाच्या नकलांसह प्रवेश-अर्ज, आपल्या जिल्ह्याच्या जिल्हा सहकारी बोर्डाकडे दि. १८ फेब्रुवारी १९६० पूर्वी पोहोंचतील अशा बेतानें पाठवावेत.

(ब) खाजगी उमेदवारांनीं देखील आपले अर्ज त्या त्या जिल्हा सहकारी बोर्डाकडे दि. १८ फेब्रुवारी १९६० पूर्वीं पाठवावेत. या उमेदवारांनीं अर्जासोबत प्रवेश-फी पाठवूं नये. तसेंच अर्ज परस्पर विद्यालयाकडे कोणीहि पाठवूं नये.

४. विद्यालयाचे प्रवेश-अर्ज व माहितीपत्रकें यांची किंमत आठ आणे (५० नये पैसे) आहे. फॉर्म व माहितीपत्रकें विद्यालयाचे कचेरींत व जिल्हा सहकारी बोर्डाचे कचेरींत सुट्टीचे दिवसांखेरीज रोज ११ ते ६ शनिवारीं सकाळीं ८ तें ११–३० या वेळांत मिळूं शकतील. अर्जाची मागणी करतेवेळीं आठ आणे रोख भरणें किंवा आठ आण्यांचीं पोष्टाचीं तिकिटें पाठविणें आवश्यक आहे. जिल्हा सहकारी बोर्डाचे पत्ते पुढील-प्रमाणें आहेत :—(१) पुणें जिल्हा सहकारी बोर्ड, १४८७, शुक्रवार पेठ, पुणें २, (२) ठाणें जिल्हा सहकारी बोर्ड, शिवाजी चौक, कल्याण, (३) कुलाबा जिल्हा सहकारी बोर्ड, बाजार पेठ, पेण, (४) सोलापूर जिल्हा सहकारी बोर्ड, द्वारा सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सोलापूर.

५. पुणें, ठाणा, कुलाबा व सोलापूर या जिल्ह्यांतून येणाऱ्या उमेदवारांनाच फक्त या विद्यालयांत प्रवेश मिळूं शकेल.

आर. पी. देशमुख,
प्रिंसिपॉल.

---

### ग्रेट ब्रिटनचा बँक रेट वाढला

ग्रेटब्रिटननें आपला बँक रेट दि. २१ जानेवारी रोजीं १% नें वाढवून ५% केला. २० नोव्हेंबर, १९५८ पासून तो ४% होता.


**मा**धवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्यांची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

**'अर्थ' ग्रन्थमाला**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली ४ सहकार

## सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९१८] गिरगांव, मुंबई ४. [टेलिफोन : २७०९४

| | लाख | | लाख |
|---|---|---|---|
| शेअर भांडवल | रु. ८·३० | ठेवी | रु. २०९·९४ |
| रिझर्व्ह | ,, ९·०१ | खेळतें भांडवल | ,, २११·०० |
| कर्जें येणें | ,, ६७·५१ | तरतें भांडवल | ,, १६०·३८ |

तरत्या भांडवलाचें ठेवींशीं प्रमाण : ७६%

शाखा : फोर्ट, दादर, वरळी, माहीम, वडाळा, पुणें व बेळगांव.



महिला शाखा : सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव मुंबई – ४.

नेहमींच प्रगतिपर व सुरक्षित

## दि बेळगांव बँक लिमिटेड

**बेळगांव**

(शेड्यूल्ड बँक)
स्थापना १९३०

★ नियमित बचत केल्यानें कुटुंबाची व राष्ट्राची शक्ति वाढीस लागते.

★ कुटुंबांतील मंगलकार्यें, उच्चशिक्षण किंवा घरबांधणी हीं मोठ्या खर्चाचीं कामें पार पाडण्यासाठी नियमित बचत करणें अगत्याचें ठरतें.

★ बेळगांव बँकेंत क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटचें वा होम-सेव्हिंगचें खातें उघडून आपणांस ही तरतूद योग्य रीतीनें करतां येते.

व्याजाचे आकर्षक दर.

आपल्या सव्वीस शाखांतून सेवावृत्तीनें व्यापार व बचत यांची नेहमींच वाढ करीत असलेली

**दि बेळगांव बँक लिमिटेड.**

एच्. एस्. कुलकर्णी
जनरल मॅनेजर

## राहणीमानाचा दर्जा

### एकट्या चलनवाढीमुळें खालावत नाहीं

चलनवाढीमुळें महागाई होते असें मान्य केलें तरीसुद्धां चलनवाढ कां होते हा प्रश्न शिल्लक राहतोच. चलनवाढ ही कांहीं निसर्गसिद्ध गोष्ट नाहीं. आवश्यक असल्याशिवाय रिझर्व्ह बँक चलनांत वाढ होऊं देणार नाहीं. पंचवार्षिक योजना यशस्वी होण्यासाठी चलनवाढ होणें अपरिहार्य आहे. असें अर्थशास्त्रज्ञांचें मत आहे आर्थिक प्रगतीसाठी कारखाने, त्याकरितां लागणारें लोखंड, पोलाद, सिमेंट व इतर कच्चा माल, यंत्रसामुग्री, वगैरे उत्पादनाचीं साधनें मुबलक प्रमाणांत पाहिजेत त्यामुळेंच थोड्या काळांत जीवनोपयोगी वस्तू मोठ्या प्रमाणांत मिळूं लागतील. आपल्यासारख्या गरीब देशांत, आवश्यक त्या गरजा भागवून अशा तऱ्हेच्या भांडवल निर्मितीसाठी लोक फारशी बचत करूं शकत नाहींत. कर व कर्जाच्या रूपानें सरकार लोकांकडून जो कांहीं थोडाफार पैसा उभा करतें, त्यापेक्षा जास्त पैसा निरनिराळ्या योजनांमध्यें गुंतविणें आवश्यक आहे. पण त्यामुळें सध्यांच्या सारखी महागाईची आपत्ति ओढवत असेल तर लोकांच्या बचतीइतकीच पैशाची गुंतवण करणें शहाणपणाचें नाहीं का ठरणार ? असा प्रश्न कोणी विचारील. झपाट्यानें वाढणाऱ्या लोकसंख्येचा विचार करतां जर आपण थोड्या काळांत पुष्कळच उत्पादनवाढ केली तरच लोकांच्या आर्थिक परिस्थितींत थोडीफार सुधारणा होण्याची शक्यता आहे; नाहींतर वाढती लोकसंख्या वाढलेलें उत्पादन खाऊन टाकील व दरमाणशीं उत्पन्न आहे तेंच राहील. अशा परिस्थितींत आपली लोकसंख्या ज्या प्रमाणांत वाढत आहे त्यापेक्षा जास्त प्रमाणांत उत्पादनवाढ होण्यासाठी, एखादा कारखानदार ज्याप्रमाणें बँकेकडून कर्ज काढून माल तयार करतो, त्याप्रमाणें सरकार रिझर्व्ह बँकेकडून कर्ज घेऊन तें सार्वजनिक क्षेत्रांतील निरनिराळ्या योजनांमध्यें गुंतवतें. राजकीय दृष्ट्यासुद्धां जलद उत्पादनवाढीची फार आवश्यकता आहे. आर्थिक परिस्थिति सुधारल्याशिवाय लोकांना स्वातंत्र्याचें खरें सुख अनुभवावयास मिळणार नाहीं. त्याचप्रमाणें शेतकरी–कामगारवर्गाला पोटभर अन्न व अंगभर वस्त्र मिळाल्याशिवाय प्रौढ मतदारपद्धतीवर आधारलेली आपली लोकशाही यशस्वी होणें कठीण आहे.

या साऱ्या कारणांमुळें पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीपासून सरकारनें तुटीचीं अंदाजपत्रकें करून चलनवाढीच्या रूपानें पैशाची गुंतवण केली. १९५०–५१ ते १९५५–५६ दरम्यान सरकारी अंदाजपत्रकांत एकंदर ४०३ कोटी रुपयांची तूट होती. १९५५–५६ पासून सार्वजनिक क्षेत्रांमध्यें पैशाच्या गुंतवणुकीचें प्रमाण वाढत आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या दोन वर्षांत एकंदर १,५०० कोटी रु. सार्वजनिक क्षेत्रांत गुंतवले गेले त्यांपैकीं ५०० कोटी रु. चलनवाढ करून उभे केलेले होते. १९५८–५९ मध्यें २२० कोटी रुपयांची अंदाजपत्रकांत तूट येईल अशी अपेक्षा आहे.

सरकारनें योजनांच्या निरनिराळ्या भागांत पैशाची गुंतवणूक केली, कच्चा माल खरीद केला, कारखाने बांधण्यास सुरुवात केली, मजुरांना काम दिलें म्हणजे अर्थातच लोकांच्याजवळ असणाऱ्या पैशांत वाढ होते. त्यासंबंधींचे आंकडेहि प्रसिद्ध झाले आहेत. ५४–५५ मध्यें लोकांचेजवळ १,९२१ कोटी रु. होते. ५६–५७ मध्यें २,२१३ कोटी झाले. ५८–५९ मध्यें त्यांची वाढ २,३८९ कोटीपर्यंत गेली. १९५९ च्या मेमध्यें तो आंकडा २,५३६ कोटीवर गेला. त्याचप्रमाणें शेड्यूल्ड बँकांनीं कारखानदार व व्यापारी वर्गाला दिलेल्या कर्जामध्येंहि प्रतिवर्षी वाढ होत आहे. ५५–५६ मध्यें मागील वर्षापेक्षा त्यामध्यें १०१ कोटी रु. ची वाढ झाली. ५६–५७ मध्यें १४२ कोटींची व ५८–५९ मध्यें १६४ कोटी रुपयांची वाढ झाली.

किंमतींतल्या वाढीचे आंकडे देणेंहि फारसें कठीण नाहीं. त्यांचे निरनिराळे निर्देशांक आहेत. साधारणपणें पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटच्या वर्षी, मे १९५५ पासून किंमती चढूं लागल्या. ५२–५३ सालचा निर्देशांक १०० धरला तर ५४–५५ सालीं घाऊक किंमतीचा निर्देशांक ८९·६ होता तो वाढत जाऊन जून १९५९ मध्यें ११५·५ झाला. या काळांत सुमारें २८·८ टक्क्यांनीं किंमती वाढल्या. फक्त अन्नधान्यांच्या किंमतींत याहिपेक्षा जास्त वाढ झाली. त्या ४४·१ टक्क्यांनीं वाढल्या. मार्च १९५९ पासून त्यांच्या किंमतींत वाढ होत असून तो निर्देशांक आतां १२०·९ इतका झाला आहे.

सरकारनें पंचवार्षिक योजनांवर आतांपर्यंत जो पैसा खर्च केला त्यामुळें झालेली चलनवाढ आणि सर्वसाधारण नागरिकांच्या जीवनाला आवश्यक अशा वस्तूंच्या किंमतींमध्यें झालेली वाढ या गोष्टी निर्विवाद आहेत. त्यामध्यें कार्यकारण संबंध जोडला म्हणजे चलनवाढीमुळें राहणीचा दर्जा खालावतो हें प्रमेय सिद्ध झालें. पण तितक्या सहजरीतीनें सिद्ध झालेली गोष्ट जरा संशयास्पदच मानली पाहिजे. आंकडे कधीं खोटें सांगत नाहींत हें खरें असलें तरी आंकड्यांनीं कांहींहि सिद्ध करतां येतें हेंहि तितकेंच खरें आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ४०३ कोटी रुपयांची चलनवाढ झाली. असें असूनसुद्धां किंमती कां वाढल्या नाहींत ? १९५१ मध्यें कोरिअन युद्धामुळें वाढलेल्या किंमती १९५२ च्या मेमध्यें २० टक्क्यांनीं खालीं आल्या. ५३–५४ व ५४–५५ मध्यें या खालीं आलेल्या किंमती तेथेंच स्थिर होण्याऐवजीं आणखी खालीं सरल्या. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांतसुद्धां किंमती सारख्या वाढतच गेल्या आहेत असें नाहीं. १९५५ सप्टेंबर १९५६ ऑक्टोबरमध्यें किंमती खालीं आल्या होत्या. डिसेंबर १९५७ मध्यें मागील डिसेंबरपेक्षा किंमतींचा निर्देशांक थोडा खालींच होता. त्यानंतर १९५८ सप्टेंबरच्या मध्यावर तो ११७ पर्यंत वाढला व पुनः किंमती वाढूं लागल्या असून वर सांगितल्याप्रमाणें जून १९५९ मध्यें ११५·५ निर्देशांक येऊन ठेपला आहे. हा निर्देशांक अन्नधान्याच्या किंमती, औद्योगिक कच्च्या मालाच्या किंमती व तयार मालाच्या किंमती मिळून झालेला आहे. त्यांमध्यें अन्नधान्याच्या किंमतींमध्यें फारच चढउतार झालेले असून, तयार मालाच्या किंमतींमध्यें फरक कमी प्रमाणांत झालेले आहेत.

या विवेचनावरून हें लक्षांत येईल कीं, विशिष्ट वर्षांतील किंमतीच्या निर्देशांकांचाच उल्लेख केला तर त्यामधील काळांत किंमतींत फार वाढ झाली आहे असें आपलें मत सहजच होतें. पुष्कळ वेळां असें म्हटलें जातें कीं, अन्नधान्याच्या किंमती ५० टक्क्यांनीं वाढल्या आहेत. मे १९५५ आणि नोव्हेंबर १९५८ मधील किंमतींचे निर्देशांक घेतल्यास हे म्हणणें खरें आहे. परंतु त्याचबरोबर हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे, कीं मे १९५५ मध्यें किंमती इतक्या घसरल्या होत्या कीं त्या आणखी घसरूं नयेत म्हणून रिझर्व्ह बँकेला विशिष्ट धोरण आखावें लागलें. किंमतीबद्दलच्या विवेचनांत दुसरी एक गोष्ट नेहमीं विसरली जाते ती म्हणजे किंमतींतील चढउतार. १९५३ पासून सर्वसाधारणपणें

लोकांजवळील पैसा वाढतच गेला आहे, असें असतां १९५५ च्या मध्यापर्यंत किंमतीचें निर्देशांक पडतच होतें. इतकेंच नव्हे या वर्षीसुद्धां सुरुवातीला तो खालीच येत होता. जूनपासून मात्र त्यानें पुन: उचल खाल्ली. ही अशी चढउतार कां होते हा प्रश्न सहजच उभा राहातो. चलनवाढीमुळें किंमती वाढतात असें म्हणण्याच्या मार्गांतहि मोठीच अडचण आहे. किंमतींमध्यें चढउतार होत असेल म्हणजे चलनवाढीव्यतिरिक्त किंमतीवाढीचें दुसरें कांहींतरी कारण असलें पाहिजे असें वाटूं लागतें.

वस्तुत: चलनवाढ होऊन लोकांच्या हातांत जास्त पैसा खेळूं लागला म्हणजे त्याचा मागणीवर परिणाम होतो, पण वस्तूंच्या किंमतीवर मागणीचा जसा परिणाम होतो तसा पुरवठ्याचाहि होतो. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत राष्ट्रीय उत्पादन १८ टक्क्यांनीं वाढलें. विशेषत: १९५३–५५ या वर्षांत अन्नधान्याचें पीक भरघोस आलें. अन्नधान्याचें उत्पादन ५३–५४ सालीं १७ टक्क्यांनीं वाढलें. पुढील वर्षींहि त्याच प्रमाणांत राहिलें. किंमतीचा निर्देशांक १९५५ सालीं एकदम खाली येण्याचें हें प्रमुख कारण आहे.

यानंतर १९५४–५५ व ५५–५६ सालीं अन्नधान्याच्या उत्पादनांत घट झाली हें खरें आहे. तरीसुद्धां १९५८–५९ सालीं या उत्पादनानें उच्चांक गांठला असून ७ कोटी टनावर त्याचें उत्पादन आहे. असें असतां ५९ च्या मार्चपासून किंमतींमध्यें वाढ होण्याचें कारण काय असा प्रश्न उभा राहतो. त्याचें उत्तर बेसुमार चलनवाढ असेंच नाहीं काय ? तसें उत्तर देण्यापूर्वी आणखी एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. उत्पादन म्हणजे पुरवठा नव्हे. अधिक उत्पादन होऊनसुद्धां बाजारांत पुरवठा कमी होणें शक्य आहे. शेतांत धान्य उत्तम पिकलें म्हणजे शेतकरी स्वत:साठी जास्त ठेऊन घेतो. अलीकडे त्याची स्थिति थोडीशी सुधारल्यामुळें त्याला हें शक्य झालें आहे. भाव वाढवून अधिक फायदा उकळण्याच्या हेतूनें घाऊक व्यापारी व दलाल धान्याचे, साखरेचे व इतर वस्तूंचे सांठे करतात हें सर्वांनाच माहीत आहे व सांठेबाजीमुळें किंमती वाढूं लागल्या म्हणजे लोकहि वस्तू महाग होत आहेत व कदाचित् अजिबात मिळणार नाहींत ह्या भीतीनें आपापल्या शक्तीप्रमाणें त्यांचा सांठा करूं लागतात. अशा रीतीनें बाजारांत पुरवठा कमी होतो व मागणी वाढते व त्याचा परिणाम किंमतींत वाढ होण्यांत होतो. धान्याच्या किंमतींत वाढ झाली म्हणजे अर्थातच मजुरीचें दर वाढविण्याविषयीं मजूर संघटनांची मागणी सुरू होते. मजुरी वाढली व उत्पादनखर्चांत वाढ झाली म्हणजे इतर वस्तूंच्या किंमतींहि वाढूं लागतात.

त्याचप्रमाणें राष्ट्रीय उत्पादनांतहि समाधानकारक वाढ झाल्याचें दिसून येत नाहीं. १९५७–५८ मध्यें १ टक्क्यांनीं कमी झालें. ११,००० कोटींवरून १०,८३० कोटींवर आलें. ५३–५४ ते ५७–५८ दरवर्षी सरासरी २·८ वाढलें. ही वाढ ज्या देशामध्यें योजनाबद्ध अर्थव्यवस्था नाहीं त्या देशांतील वाढीपेक्षांहि कमी आहे. आणि अग्रगत देशांच्या दृष्टीनें तर फारच कमी आहे. लोकसंख्येची वाढ लक्षांत घेतली तर दर माणशीं उत्पन्न ७ वर्षांपूर्वी होतें तितकेंच राहिलें आहे.

चलनवाढ व वस्तूंच्या किंमतींतील वाढ यांचा संबंध वाटतो तितका सरळ नसून तो बराच गुंतागुंतीचा आहे हें आतां स्पष्ट झालें असेल. कारणें कांहींहि असलीं तरी महागाईमुळें सामान्य माणसाच्या राहाणीचा दर्जा खालावला आहे यांत शंका नाहीं पण या प्रश्नाचाहि, आपण एकंदरींत विचार न करतां समाजांतील निरनिराळ्या वर्गांवर महागाईचा काय परिणाम झाला आहे हें पाहिलें असतां तें जास्त उपयुक्त ठरेल. धान्याचें उत्पादन वाढल्यास शेतकरी स्वत:करितां भरपूर धान्य, राखून ठेवितो व त्या दृष्टीनें त्याची स्थिति कांहींशी सुधारते असें म्हणण्यास हरकत नाहीं. सधन शेतकरी, घाऊक व्यापारी किंवा दलाल यांना अन्नधान्यांच्या किंमती वाढल्यामुळें सहाजिकच जास्त फायदा होतो. साखरेची किंमत १–२ टक्क्यांनीं वाढल्यामुळें वर्षाकांठीं सुमारें २५ कोटी रु. जनतेच्या खिशांतून व्यापारी व कारखानदारवर्गाच्या खिशांत पडतात अशा तऱ्हेचा हिशेब कांहीं अर्थशास्त्रज्ञांनीं केला आहे. त्याचप्रमाणें कारखानदारवर्गाचें उत्पन्नहि तयार मालाच्या किंमती चढल्यास वाढतें. सुरुवातीला मजूरवर्गाच्या राहाणीचा खर्च वाढतो व संघटनेच्या बळावर त्यांना आपली मजुरीहि वाढवून घेतां येते.

राहातां राहिला ठराविक उत्पन्नाचा मध्यमवर्ग. महागाईमुळें हाच वर्ग फार मेटाकुटीस येतो. महिन्याचा खर्च भागवणें जेथें कठीण होऊन बसतें तेथें चैनीच्या किंवा अनावश्यक गोष्टींवर खर्च करणें दूरच. पुस्तकें, प्रवास, शिक्षण, वगैरे महत्त्वाच्या गोष्टींवरील खर्चांतहि कपात करावी लागते. तरीसुद्धां आजच्या परिस्थितींत कांहींहि कुरकूर न करतां त्यागबुद्धीनें व सेवाधर्मानें देशाच्या प्रगतीस हातभार लावणें हेंच मध्यमवर्गाचें ऐतिहासिक कर्तव्य आहे. ते तो योग्य प्रकारें पार पाडील अशी खात्री बाळगण्यास कांहींहि हरकत नाहीं.

(प्रा. एन. ए. मावळंकरांचें भाषण, आकाशवाणी पुणेकेंद्राच्या सौजन्यानें)


दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

शेड्यूल्ड बँक : स्थापना : १९३५

—: भांडवल :—

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ३१,००,००० |
| गंगाजळी व इतर निधि | रु. | १४,६०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १५ कोटींचे वर |

बँकेच्या ५१ शाखा

अहमदनगर, अकोला, अमरावती, अकलूज, औरंगाबाद, मुंबई (फोर्ट, दादर, गिरगांव, [तीन शाखा] जव्हेरी बाजार, मराठा मंदिर, शींव, वरळी) भिवंडी, बेळगांव, चाळीसगांव, धुळें, हरिहर, हिंगोली, हुबळी, द. हैद्राबाद, जळगांव, जालना, कल्याण, किर्लोस्करवाडी, कोल्हापूर, कोपरगांव, खामगांव, लातूर, मोमिनाबाद, नागपूर, नांदेड, नाशिक, पनवेल, पुणें (भवानी पेठ, डेक्कन जिमखाना, खडकी, सोमवार पेठ, टिळकरोड, शिवाजीनगर व गणेशखिंड) परळीवैजनाथ, रत्नागिरी, ठाणें, यवतमाळ, सांगली, सोलापूर, (फलटण गल्ली, मोरारजी पेठ), श्रीरामपूर.


मुख्य कचेरी थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.


बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

वि. वि. जोग, मॅनेजर.

# STURDY — STABILITY

*Elegence* — *Precision*






Great pyramids and sphynx in Egypt are a puzzle to the modern world. They possess incredible intricacy of sturdiness and craftsmanship. They stand centuries together undamaged—Really a wonderful example for sturdiness. As well it is miracleously intricated with craftsmanship. Very few are the examples of such type where sturdiness & elegance go hand in hand.

Similarly in machinery world of today, sturdiness and precision workmanship is well needed. A slightest mistake in designing and workmanship means- an immeasurable loss of money, time and work.

***We stand for....***

- Cams & keys of various types.
- Plastic & Rubber plantation equipment, Extruders, Spreading machines & mixing mills.
- Chemical Engineering equipment, Auto-cloves, pressure-pans, Kiers etc.
- Calenders, Beaters and presses of various types
- Die-punches & moulds.

***For success***



**THE SOUTHERN MACHINE INDUSTRIES**
GULTEKDI ROAD, SWARGATE POONA 2.

Proprietor . SUPANEKAR BROS.

Phone : 6640
Gram : 'SOUMACHINE'

PARKERSON

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ **माकडछाप** म्हणजेच **काळी टूथ पावडर** ★


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.